RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ६५] बुधवार, मे १७, २०२३/वैशाख २७, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १८१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ९ वा मजला, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१, दिनांक १० मे, २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम, २०११.**

क्रमांक मपप-०९२२/प्र.क्र.५३/अधिनियम.—ज्याअर्थी, महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम, २०११ (२०१६ चा महा. ६) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ५(१) नुसार महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र परावैद्यक परिषद (यात यापुढे जीचा निर्देश "उक्त परिषद" असा करण्यात आला आहे) शासन अधिसूचना, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, दिनांक १८ ऑक्टोबर २०१७ अन्वये गठित केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त परिषदेचा कालावधी अधिसूचनेच्या दिनांकापासून ५ वर्षाच्या कालावधीसाठी असल्याने परिषदेच्या सदस्यांचा कालावधी दिनांक १७ ऑक्टोबर २०२२ रोजी संपुष्टात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाचा The National Commission for Allied and Healthcare Professions (NCAHP) Act, 2021 (यात यापुढे ज्याचा निर्देश "केंद्र शासनाचा अधिनियम" असा करण्यात आला आहे) दिनांक २५ मे २०२१ पासून अंमलात आला आहे ; आणि राज्यात त्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर केंद्र शासनाच्या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या परिणाम स्वरूप राज्याचा उक्त अधिनियम परिणामक्षम राहणार नसल्याने तो पूर्णपणे परत (Repeal back) घ्यावा लागणार आहे आणि सदर केंद्र शासनाच्या अधिनियमाची अंमलबजावणी होईपर्यंत महाराष्ट्र परावैद्यक परिषदेचे कामकाज सुरू ठेवणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर उक्त परिषदेची नव्याने निवडणूक घेणे सुयोग्य ठरणार नसल्याने केंद्र शासनाच्या अधिनियमाची अंमलबजावणी होईपर्यंत उक्त परिषदेवर प्रशासकाची नियुक्ती करावी लागेल ;

आणि ज्याअर्थी, उक्त परिषदेचे कामकाज अंतरिम कालावधीसाठी सुरळीत चालावे यासाठी शासनाने श्री. उमेशचंद्र प्रकाश सोनार, निदान ॲनालिसिस, हात दरवाजा, गांधी चौक, नंदुरबार, यांची उक्त परिषदेचे सर्व अधिकार व कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम, २०११ पूर्णपणे परत घेण्यात येईपर्यंत उक्त अधिनियमाच्या कलम ३८ (२) (ख) नुसार शासनास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून परिषदेचे दैनंदिन कामकाज पार पाडण्यासाठी परिषदेवर श्री. उमेशचंद्र प्रकाश सोनार, यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वैशाली सुळे,**
शासनाच्या उपसचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

G. T. Hospital Complex, 9th floor, New Mantralaya, Lokmanya Tilak Road,
Mumbai 400 001, dated the 10th May, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PARAMEDICAL COUNCIL ACT, 2011.

क्रमांक मपप-०९२२/प्र.क्र.५३/अधिनियम.— Whereas, the Government of Maharashtra has constituted the Maharashtra Paramedical Council (hereinafter referred to as "the said Council") in accordance with section 5(*1*) of the Maharashtra Paramedical Council Act, 2011 (No.VI of Mah. 2016) (hereinafter referred to as "the Said Act") by the Government Notification, Medical Education and Drugs Department, dated 18th October 2017 ;

And whereas, the term of said Council is for a period of 5 years from the date of notification, so the term of the members of the said Council has been expired on 17th October 2022 ;

And whereas, the Central Government's The National Commission for Allied and Healthcare Professions (NCAHP) Act, 2021 (hereinafter referred to as the "Central Government's Act") has come into effect from 25th May 2021. And the process of implementation in state is underway. As a result of the implementation of this Central Government Act, the said Act of the state will not be effective and it will have to be repealed completely. So, the functioning of Maharashtra Paramedical Council must continue till the implementation of this Central Government Act. Since it would not be appropriate to hold fresh elections of the said Council due to the implementation of the Central Government's Act, the Administrator will have to be appointed on the said Council :

And whereas, in order to ensure smooth functioning of the said council for an interim period, the Government of Maharashtra has decided to appoint Shri Umeshchandra Prakash Sonar, Nidan Analysis, Hat Darwaja, Gandhi Chowk, Nandurbar, as an Administrator to discharge all the powers and duties of the said council.

Now, therefore, Shri Umeshchandra Prakash Sonar, is appointed as the Administrator of the said Council to carry out the day-to-day functioning of the Council in exercise of the powers conferred on the Government under Section 38(*2*) (*b*) of the said Act, till the Maharashtra Paramedical Council Act, 2011 is fully withdrawn.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VAISHALI SULE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.